वित्तीय वर्ष, २०१६-१७ च्या वार्षिक योजनेतील नियतव्ययाच्या प्रदेशनिहाय संवितरणाकरिता, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यांसाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील नियम ७ अन्वये महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी दिलेले निदेश.

प्रास्ताविक

१. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१(२) अन्वये भारताच्या राष्ट्रपतींनी केलेल्या " महाराष्ट्र राज्य (विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यांसाठी राज्यपालांची विशेष जबाबदारी) आदेश, १९९४" याद्वारे विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यांसाठी विकास मंडळांच्या क्षेत्रांच्या संबंधात संविधानाच्या अनुच्छेद ३७१ चा खंड (२) उपखंड (ख) आणि (ग) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांवर विशेष जबाबदारी सोपवली आहे. दिनांक ५ सप्टेंबर, २०११ रोजी, महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी " विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यांसाठी विकास मंडळे आदेश २०११" काढला (यात या पुढे ज्याचा उल्लेख "आदेश" असा करण्यात आला आहे) व त्याद्वारे उक्त तीन प्रदेशांसाठी स्वतंत्र विकास मंडळे गठित केली.

२. उक्त आदेशाच्या नियम ७ अनुसार, एकूण राज्याच्या म्हणून असलेल्या गरजांचा विचार करुन, विकास मंडळांच्या क्षेत्रांवरील विकास खर्चासाठी निधींचे समन्याय्यतेने नियतवाटप होत असल्याची खात्री करुन घेणे, ही महाराष्ट्राचे राज्यपाल यांची विशेष जबाबदारी आहे.

३. उक्त आदेशाच्या नियम ८ अनुसार, राज्यपाल यांनी केलेले निधींचे किंवा नियतव्ययांचे नियत वाटप, राज्य विधानमंडळापुढे ठेवावयाच्या वार्षिक वित्तीय विवरणपत्रात (पुरवणी अर्थसंकल्पासह) दर्शविण्यात येईल आणि उपरोक्तपणे नियतव्ययांच्या संबंधातील विकास कार्ये, राज्य शासन पार पाडील किंवा पार पाडावयास लावील आणि असे नियतवाटप केलेले निधी हे, एका मंडळाकडून दुस-या मंडळाकडे न वळवता येण्याजोगे असतील. आणखी, नियम ८ नुसार राज्य शासन, सर्व क्षेत्रांकरिताच्या विकास खर्चासाठी प्रदेशनिहाय व प्रवर्गनिहाय नियतव्यय व खर्च यांचे विवरणपत्र देखील तयार करील. या विवरणपत्रामध्ये मागील वित्तीय वर्षासाठीच्या प्रत्यक्ष संवितरित रकमा व प्रत्यक्ष खर्च यांचा तपशील दिलेला असेल.

४. उक्त आदेशाच्या नियम १० नुसार प्रत्येक विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रासाठी तंत्रशिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण यासाठी पुरेशा सोयी उपलब्ध करुन देण्यासाठी आणि राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये एकूण राज्याच्या म्हणून असलेल्या गरजांचा विचार करुन नोकरीच्या पुरेशा संधी उपलब्ध करुन देण्यासाठी समन्यायी व्यवस्था केली जाईल याची राज्यपाल खातरजमा करतील.

सिंचन क्षेत्रातील अनुशेषाची विद्यमान स्थिती

५. निर्देशांक व अनुशेष समितीने सिंचन क्षेत्रातील (०१.०४.१९९४ रोजीच्या) प्रदेशनिहाय अनुशेषाचे मूल्यमापन केले होते (जोडपत्र-१). सिंचन क्षेत्रातील ०१.०४.१९९४ रोजीचा वित्तीय अनुशेष रु. ७४१८ कोटी होता. वर्ष २००० मध्ये त्याची पुनर्गणना प्रचलित मापदंड विचारात घेऊन रु.६६१८.३७ कोटी इतकी सुधारीत करण्यात आली होती. सन २००१ पासून हा अनुशेष भरुन काढण्याच्या मुख्य उद्देशाने राज्यपाल निदेश देत आले आहेत. मार्च २०११ पर्यंत सर्व जिल्हयांमधील वित्तीय अनुशेष भरुन निघाला आहे. एप्रिल १९९४ रोजी असलेल्या निव्वळ पेरणी क्षेत्राच्या संदर्भात निर्माण केलेल्या सिंचन क्षमतेची रब्बी समतुल्य (रसतु) एककामध्ये राज्य सरासरी ३५.११% होती. अनुशेषांतर्गत जिल्हयांसाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करुन दिल्यामुळे भौतिक अनुशेष सुद्धा भरुन निघेल असे अपेक्षित होते. मात्र कालापव्यय आणि दर वाढ यांमुळे भौतिक साध्याबाबत अनुरुप कामगिरी झाली नाही.

६. सिंचन अनुशेष राज्यातील अमरावती, अकोला, वाशिम आणि बुलढाणा या चार जिल्हयांमध्ये सध्या अस्तित्वात आहे. २०१०-११ ते २०१४-१५ वर्षांसाठी अनुशेष निर्मूलनाची पंचवार्षिक योजना तयार करुनही, आणि योजना कालबद्धरित्या सुधारित करुनही, जलसंपदा विभाग ४ जिल्हयातील सिंचनाचा भौतिक अनुशेष दूर करु शकला नाही. खरं तर, प्रस्तावित योजनेत विर्निदिष्ट केलेल्या उद्दिष्टा पैकीचे साध्य अत्यंत कमी झाले आहे. जून २०१५ अखेर उर्वरित भौतिक अनुशेष २,१४,२६९ हेक्टर (रसतु) एवढा होता (जोडपत्र-२ पहा). हा अनुशेष निर्मूलन करण्यासाठी, जलसंपदा विभागाने २०१५-१६ ते २०१८-१९ या चार वर्षांसाठीचा सुधारित अनुशेष निर्मूलन कार्यक्रम सादर केला आहे (जोडपत्र-३ पहा). राज्यपाल यांनी अपेक्षा व्यक्त केली आहे की, अनुशेष निर्मूलन कार्यक्रमांतर्गत प्रत्येक वर्षासाठीचे सिंचन क्षमता निर्माण करण्याचे उद्दिष्ट पाळले जाईल. राज्यपाल यांनी चिंता व्यक्त केली आहे की,

प्रशासकीय बाबी, जसे की भुसंपादन आणि पुनर्वसन तसेच रिक्त पदे भरणे याबाबत सतत पाठपुरावा करुनही यावर अदयापही समाधानकारकरित्या मार्ग निघाला नाही. याचा परिणाम ४ अनुशेष जिल्हयांसाठी उपलब्ध केल्या गेलेल्या निधीच्या वापरावर होत आहे.

## २०१६-१७ या वार्षिक योजनेमध्ये सिंचन क्षेत्राकरिता नियतवाटप

७. नियोजन विभागाने दिनांक ५ मार्च, २०१६ रोजीच्या पत्राद्वारे असे दर्शविले आहे की, वार्षिक योजना २०१६-१७ मध्ये जलसंपदा विभागाकरिता रु. ७८५७.३७ कोटी इतके एकूण नियतवाटप उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

क) यापैकी, रु. ९४६.८४ कोटी इतकी रक्कम पूर नियंत्रण, खार जमिनी, जलविद्युत प्रकल्प, लाभक्षेत्र विकास, महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार कार्यक्रम, सामाईक योजना (गुणवत्ता नियंत्रण, जल विज्ञान प्रकल्प व यांत्रिकी यंत्रणा इ.) आणि आर्थिक वर्ष २०१०-११ साठीच्या निदेशातील परिच्छेद २२ नुसार घ्यावयाचे प्रकल्पांचा शेल्फ निर्माण करणे आणि भूसंपादन कायदयातील तरतूदी अंतर्गत लोकअदालत अथवा मा. न्यायालयाच्या आदेशानुसार भूसंपादन आणि पुनर्वसन यातील अडचणी मिटविणे यांसारख्या योजनांसाठी राखून ठेवण्याचे प्रस्तावित आहे. या प्रकारची देणी दिल्यामुळे मंडळ निहाय खर्चामध्ये काही असमतोल निर्माण झाल्यास यापुढील निदेशांमध्ये तो समायोजित करण्यात येईल.

ख) राज्यपाल यांनी, राज्यशासनाच्या शिफारशीनुसार, ५ आंतरराज्य प्रकल्प आणि गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पासाठी पुरेसा निधी प्राथम्याने मिळण्याच्या दृष्टीने हे प्रकल्प निदेशांच्या कक्षेबाहेर ठेवण्यास संमती दिली आहे. आंतरराज्य प्रकल्पांसाठी रु.२०० कोटी आणि गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पासाठी रु. १००० कोटी इतके नियतवाटप प्रस्तावित करण्यात आले आहे.

ग) केंद्र शासनाने "प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना"(PMKSY) जाहिर केली आहे. या योजनेचे ४ घटक आहेत. जसे वेगवर्धीत सिंचन लाभ कार्यक्रम (AIBP) मोठे, मध्यम आणि राष्ट्रीय प्रकल्प जलदगतीने पूर्ण करण्यावर भर, प्रत्येक शेताला पाणी, प्रती थेंब अधिक पीक, आणि पाणलोट क्षेत्र विकास. केंद्र शासनाने देशातील ए.आय.बी.पी. अंतर्गत २३ प्रकल्प २ वर्षात म्हणजे मार्च २०१७ पर्यंत पूर्ण करण्याचे ठरविले आहे. त्यात महाराष्ट्रातील ७ प्रकल्प,

ज्यांची उर्वरित किंमत रु. ३०१६ कोटी आणि ज्याद्वारे १.०३ लाख हेक्टर ची अतिरिक्त सिंचन क्षमता निर्माण होवू शकेल, यांचा समावेश आहे. केंद्र शासनाकडून रुपये ११३३ कोटीचे केंद्रिय सहाय्य अपेक्षीत आहे. राज्य शासनाने या ७ प्रकल्पांसाठी २०१५-१६ मध्ये रु. ९३८ कोटी दिले आहेत, आणि आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये उर्वरित रु. २०७८ कोटींची तरतूद करावयाची आहे. राज्यपाल यांनी, राज्यशासनाच्या शिफारशीनुसार, उर्वरित महाराष्ट्र प्रदेशातील प्रकल्पांसाठी लागणारी तरतूद समायोजित करण्यासाठी रु. ३०० कोटी निदेशांच्या कक्षे बाहेर ठेवण्यास, हे रु. ३०० कोटींचे नियतवाटप पुढील निदेशांमध्ये इतर प्रदेशांकडे नियत वाटपांच्या तत्वांनुसार वळती करण्यात यावे, या अटीवर परवानगी दिली आहे.

घ) म्हणून, जलसंपदा विभागाकरिता उर्वरित रु. ५४१०.५३ कोटी इतके विभाज्य नियतवाटप आहे. यामध्ये आदिवासी उपयोजनेखालील रु. ५० कोटीचा अंतर्भाव आहे. म्हणून जलसंपदा विभागासाठी सर्वसाधारण योजनेअंतर्गत रु. ५३६०.५३ कोटी उपलब्ध आहेत.

८. शासनाने दर्शविलेली निधीची उपलब्धता, अनुशेष निर्मूलनाच्या ४ वर्षांच्या योजनेप्रमाणे लागणारा आवश्यक निधी, आणि एकूण राज्याच्या म्हणून असलेल्या गरजा लक्षात घेऊन, राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की , वार्षिक योजना २०१६-१७ मध्ये सिंचन क्षेत्राकरिता नियतवाटप खालील प्रमाणे करण्यात येईल.

(i) सिंचन क्षेत्रासाठी एकूण नियतवाटपाच्या विभाज्य तरतूदीमधून, ज्या जिल्हयांचा भौतिक अनुशेष शिल्लक आहे, त्या अमरावती विभागातील ४ जिल्हयांसाठी पुरेसा निधी प्रथम राखून ठेवण्यात येईल. अनुशेष निर्मूलनासाठीच्या निश्चित केलेल्या प्रकल्पांची कामाची प्रगती लक्षात घेऊन राज्यपालांचे असे मत आहे की, या ४ जिल्हयांसाठी रु. ७५० कोटी इतकी अतिरिक्त तरतूद करण्यात यावी.

(ii) वर स्पष्ट केल्याप्रमाणे अनुशेष दूर करण्याकरिता आवश्यक निधी राखून ठेवल्यानंतर, राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, तीन प्रदेशांमध्ये विभाज्य योजना नियतव्ययाचे वाटप त्या प्रदेशांची लोकसंख्या आणि निव्वळ पेरणी क्षेत्र यातील प्रत्येक घटकाला सम भारांकाच्या आधारे करावे. तीन प्रदेशासाठी निधीच्या हिश्श्याची टक्केवारी जोडपत्र-५ अ मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे.

(iii) दिनांक १५ फेब्रुवारी २०१४ मधील परिच्छेद ८ (III) नुसार, आर्थिक वर्ष २०१२-२०१३ पर्यंतच्या खर्चाच्या अधिक/तुटीच्या प्रदेशनिहाय दुरुस्त्या अंमलात आणण्यात आल्या आहेत. या दुरुस्त्या आर्थिक वर्ष २०१४-१५, २०१५-१६ आणि २०१६-१७ या तीन वर्षात समान टप्प्यात करण्यात येतील, असे या निदेशात नमूद केले होते. त्यानुसार १५ फेब्रुवारी २०१४ रोजीच्या निदेशातील जोडपत्र ७ फ मध्ये दर्शविल्याप्रमाणे वित्तीय वर्ष २०१६-१७ साठीची दुरुस्ती लागू असेल. (१५ फेब्रुवारी २०१४ च्या निदेशातील जोडपत्र ७ फ हे जोडपत्र ६ मध्ये पुन्हा देण्यात आले आहे.) जोडपत्र ७ मध्ये, सिंचन क्षेत्रासाठीच्या विभाज्य नियतव्ययाचे प्रदेश निहाय वाटप (स्तंभ ६) अनुशेष निर्मूलनासाठी नियत वाटप (स्तंभ-२) केल्यानंतर उर्वरित नियतव्ययाचे लोकसंख्या व निव्वळ पेरणी क्षेत्र यांचे प्रदेशनिहाय प्रमाणाचे आधारावर केलेले वितरण (स्तंभ-४) आणि वित्तीय वर्ष २०१६-१७ साठीच्या दुरुस्त्यांचा अंतर्भाव (स्तंभ-५) करुन जलसंपदा क्षेत्रासाठीचे प्रदेशनिहाय विभाज्य नियतव्ययाचे नियतवाटप दर्शविण्यात आले आहे.

(iv) राज्यपाल यांनी असे निदेशीत केले आहे की, जरी नक्त प्रत्याक्षी मूल्य (NPV) आणि इतर बाबी यांची गरज अविभाज्य नियतव्ययातून भागविण्यात येत असेल तरी, प्रथमतः गरजेनुसार विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडील उपलब्ध निधीतून हा खर्च भागविण्यात यावा आणि तदनंतर पुढील वार्षिक योजनेच्या अविभाज्य खर्चामध्ये गृहित धरण्यात यावा.

(v) जनजाति उपयोजनेखालील निधीचे नियतवाटप जोडपत्र-८ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे करावे.

(vi) सिंचन क्षेत्रासाठी विभाज्य नियतव्ययाचे प्रदेशनिहाय अंतिम नियतवाटप खालील तक्ता १ मध्ये दिल्याप्रमाणे असेल.

सिंचन क्षेत्रातील नियतवाटपाची तत्वे (जनजाति उपयोजना)

९. राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, जनजाती उपयोजने अंतर्गत उपलब्ध निधीचे प्रदेशनिहाय वितरण त्या त्या प्रदेशाची आदिवासी लोकसंख्या आणि आदिवासी उपयोजनेखालील क्षेत्रफळ यांना प्रत्येकी ५०% भारांक देवून करण्यात यावे. जनगणना २०११ नुसार आदिवासी लोकसंख्या यासाठी

उपयोगात आणण्यात आली आहे. या तीन प्रदेशांसाठी असलेली आदिवासी उपयोजना निधींच्या हिश्यांची टक्केवारी जोडपत्र ५-ब मध्ये दिलेली आहे.

तक्ता १. २०१६-१७ साठी सिंचन क्षेत्राचे विभाज्य नियतव्ययाचे प्रदेश निहाय अंतीम नियतवाटप

(रु. कोटी)

| प्रदेश | साधारण योजनेअंतर्गत उर्वरित विभाज्य निधीचे नियतवाटप (जोडपत्र ७ पहावे) | आदिवासी उप योजना निधीचे नियतवाटप (जोडपत्र-८ पहावे) | एकूण नियतवाटप |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| विदर्भ | २४००.०१ | २१.०४ | २४२१.०५ |
| मराठवाडा | ९६२.०७ | २.६९ | ९६४.७६ |
| उर्वरित महाराष्ट्र | १९९८.४५ | २६.२७ | २०२४.७२ |
| एकूण | ५३६०.५३ | ५०.०० | ५४१०.५३ |

१०. अनुशेष असलेल्या अमरावती, अकोला, वाशिम आणि बुलढाणा या जिल्हयांचा अनुशेष दूर करण्यासाठी राखून ठेवलेले परिच्छेद ८ (i) मधील नियतवाटप हे, उर्वरित विभाज्य नियतव्ययातून या जिल्हयांसाठी जलसंपदा विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या नियतवाटपाच्या अतिरिक्त असेल. अनुशेष आणि उर्वरित विभाज्य नियतव्यय यांच्या उपलब्ध झालेल्या एकत्रित नियतवाटपातून या जिल्हयांमधील चालू कामांसाठी, अनुशेष दूर करण्यासाठी अग्रक्रम ठरविलेल्या प्रकल्पांच्या कामांसह, लागणा-या निधीची पूर्तता होईल, अशी अपेक्षा आहे.

११. जलसंपदा विभागाने असा प्रस्ताव सादर केला होता की, आधीच्या वर्षांमध्ये शिल्लक असलेला अखर्चित निधी गृहित धरुन, २०१५-१६ मध्ये अमरावती विभागातील ४ जिल्हयातील प्रकल्पांसाठी असलेले नियतवाटप खर्च होणे शक्य नसल्यामुळे, यवतमाळ जिल्हयातील बेंबळा, निम्न वर्धा आणि बावनथडी

आंतरराज्य प्रकल्प या ३ प्रकल्पांवर अमरावती विभागातील ४ जिल्हयांसाठी असलेल्या तरतुदी समायोजीत करण्यात याव्यात. या प्रस्तावास मान्यता देतांना, राज्यपाल यांनी असे निदेश दिले की, हा समायोजित केलेला निधी विदर्भ प्रदेशांतर्गत असलेल्या तरतुदींमधून अमरावती विभागात ४ अनुशेष जिल्हयांसाठी आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये वर्ग करण्यात यावा. जलसंपदा विभागाने कळविले आहे की, आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये रु. १८५ कोटी बेंबळा (रु.१०० कोटी), निम्न वर्धा (रु.६५ कोटी) आणि बावनथडी (रु.२० कोटी) या प्रकल्पांसाठी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. यानुसार, विदर्भ प्रदेशातील अनुशेष नसलेल्या जिल्हयांसाठी उपलब्ध केलेल्या निधीतून रु. १८५ कोटी आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये अनुशेषांतर्गत जिल्हयांसाठी अतिरिक्त स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात यावेत.

१२. आणखी राज्य शासनाने, सिंचन क्षेत्रासाठी अर्थसंकल्पाशिवाय बाजारातून कर्जे घेण्याचा मार्ग अवलंबल्यास, अशा प्रकारे उभारलेला पैसा हा, संपूर्ण राज्यासाठी असावा आणि वर दर्शविल्याप्रमाणे, तीन विकास मंडळांमध्ये वरील परिच्छेद ८(ii) मध्ये दर्शविल्याप्रमाणे समन्यायतेने विभागण्यात यावा. आणखी असे की, या निदेशामध्ये अंतर्भूत असलेल्या नियतवाटपांशिवाय, सिंचन क्षेत्रासाठी पुरवणी मागण्यांद्वारे अतिरीक्त तरतूद उपलब्ध झाल्यास त्यांचे संवितरण जोडपत्र-५ अ मध्ये स्पष्ट केलेल्या प्रमाणानुसार या तीन विकास मंडळांच्या क्षेत्रामध्ये करण्यात येईल.

१३. वार्षिक योजना २०१६-१७ मधील सिंचन क्षेत्रातील नियतव्ययाचे वितरण हे काटेकोरपणे प्रदेशनिहाय नियतवाटपाच्या प्रमाणात असावे. प्रधान सचिव (जलसंपदा) यांनी तीनही विभागातील खर्चाचा त्रैमासिक आढावा घ्यावा आणि जशी गरज भासेल तेंव्हा खर्चाबाबतची सुत्रे तंतोतंत जुळण्यासाठी सुधारणेबाबत उपाय योजावेत.

१४. शासनाने अपर मुख्य सचिव (नियोजन), अपर मुख्य सचिव (वित्त), व प्रधान सचिव (जलसंपदा) यांची समिती प्रकल्पनिहाय नियतवाटप अंतिम करील असे कळविले होते. नियतवाटप करतेवेळी समितीने पुर्णत्वाच्या मार्गावर असलेल्या प्रकल्पांना अग्रक्रम दयावा, जेणेकरुन त्यांचे फायदे नजिकच्या काळात शेतक-यांना मिळतील. भूसंपादन, पुनर्वसन, नक्त प्रत्याक्षी मूल्य आणि इतर मान्यता या साठी पुरेसा निधी देण्यात यावा, ज्यायोगे प्रकल्प जलद गतीने पूर्ण होण्याबाबत खात्री होईल.

१५. राज्यपालांच्या दि. १० मार्च २०१५ च्या निदेशातील परिच्छेद १४ मध्ये राज्यपाल यांनी असे निदेश दिले होते की, राज्य शासनाने थेट भूमी खरेदी बाबत धोरण तयार करावे. या संदर्भात महसूल आणि वन विभागामार्फत शासन निर्णय निर्गमित झाला असल्याबाबत राज्यपाल यांनी लक्षात घेतले आहे.

१६. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियमाच्या कलम ११ (च) मधील द्वितीय परंतुकानुसार, राज्यपालांच्या निदेशान्वये विदर्भ व मराठवाडयातील प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता किंवा सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार संबंधीत नदी-खोरे अभिकरणांनी वापर करावा. राज्यपालांच्या दि. १० मार्च २०१५ च्या निदेशातील परिच्छेद १५ मध्ये राज्यपाल यांनी निदेश दिले होते की, राज्य शासनाने संबंधीत नदी खोरे अभिकरणांनी त्यांच्या जबाबदारीचे पालन करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती मार्गदर्शक तत्वे निर्गमित करावीत. यानुसार मार्गदर्शक तत्वे निर्गमित झाली असल्याचे राज्यपाल यांनी लक्षात घेतले आहे.

१७. राज्यपाल यांचे असे निदर्शनास आले की, भारत सरकारकडून निधी वितरणासाठी विलंब होत असल्यामुळे अनुशेषांतर्गत ४ जिल्हयांतर्गत वेगवर्धीत सिंचन लाभ कार्यक्रमाच्या (AIBP) प्रकल्पांच्या अंमलबजावणीच्या वेगावर विपरित परिणाम होतो. म्हणून, राज्यपाल यांचे असे निदेश आहेत की, या चार जिल्हयांमध्ये, वेगवर्धीत सिंचन लाभ कार्यक्रमाच्या केंद्रीय निधीच्या वितरणामध्ये पडलेला खंड भरुन काढण्यासाठी योग्य ती उपाय योजना करावी आणि दरम्यान केंद्रीय हिस्सा प्राप्त करुन घ्यावा. प्रधान सचिव जलसंपदा यासंदर्भात केलेली कार्यवाही राज्यपाल यांचे माहितीस्तव सादर करतील.

१८. तीनही प्रदेशामध्ये चालू असलेल्या प्रकल्पामध्ये पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेला निधी जोडपत्र-४ मध्ये दर्शविण्यात आला आहे. चालू प्रकल्पांवरील शिल्लक किंमत आणि तसेच साधन संपत्ती "पसरली" जाण्याचे धोके लक्षात घेता, राज्यपाल यांनी असे निदेश दिले होते की, जोपर्यंत राज्य शासन चालू प्रकल्पांवरील निधीच्या उपलब्धतेवर परिणाम न होऊ देता निश्चित कालमर्यादेत प्रकल्प पूर्ण होण्याच्या दृष्टीने पुरेसा अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देत नाही, तोपर्यंत नविन प्रकल्पांचे काम हाती घेण्यात येवू नये. उत्तरदायित्वाचा व्याप लक्षात घेता, हे निदेश सुरु राहतील.

१९. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडील मोठया प्रमाणावर रिक्त पदांबाबत राज्यपाल यांना अवगत करुन देण्यात आले आहे. याचा अनिष्ट परिणाम अनुशेषांतर्गत जिल्हयातील चालू प्रकल्पांच्या प्रगतीवर होत आहे. म्हणून, दि. १० मार्च २०१५ च्या निदेशातील परिच्छेद १८ मध्ये राज्यपाल यांनी असे निदेश दिले होते की, राज्य शासन इतर प्रदेशातून बदली, नवीन भरती, पदोन्नती इत्यादी मार्गाने चार अनुशेषांतर्गत जिल्हयातील सध्या असलेली रिक्त पदे भरेल. जलसंपदा विभागाच्या अद्ययावत अहवालानुसार अमरावती विभागाअंतर्गत गट अ च्या एकुण ३५८ पदांपैकी २९ पदे (८.१० टक्के) आणि गट ब च्या ९७४ पदापैकी ३४६ पदे ( ३५.५२ टक्के) रिक्त आहेत. राज्यपाल यांचे निदेर्शनास आले आहे की, अनुशेषांतर्गत ४ जिल्हयांमध्ये मोठया प्रमाणावरील रिक्त पदे असणे हे निधी कमी खर्च होण्याच्या इतर कारणांपैकी एक कारण आहे. राज्यपाल यांचे असे निदेश आहेत की, हे निदेश निर्गमित झाल्यानंतर ४ महिन्यांपर्यंत अनुशेषांतर्गत ४ जिल्हयातील रिक्त पदे निश्चित भरण्यात यावीत.

२०. अनुशेषांतर्गत जिल्हयात जलदगतीने निर्णय प्रक्रिया आणि निधीचा जास्तीत जास्त वापर होण्याची खात्री होण्यासाठी, निधीचे पुनर्विनियोजन करण्यामध्ये लवचिकता असण्याची गरज आहे. म्हणून, राज्यपाल यांनी असे निदेश दिले होते की, अकोला, अमरावती, बुलढाणा आणि वाशिम या चार अनुशेष असलेल्या जिल्हयातील प्रकल्पांमध्ये निधीचे पुनर्विनियोजन करण्याचे अधिकार यापुढे कार्यकारी संचालक विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ यांचेकडे असतील. यासाठी, हया चार जिल्हयांना एक घटक मानण्यात यावा. राज्यपाल यांनी लक्षात घेतले आहे की, शासनाने अनुशेषांतर्गत ४ जिल्हयातील प्रकल्पांमध्ये निधीचे पुनर्विनियोजन/पुनर्वितरण करण्याचे अधिकार कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ यांना प्रदान करण्यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना नुकत्याच निर्गमित केल्या आहेत.

सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रातील अनुशेषाची स्थिती

२१. दिनांक १ एप्रिल, १९९४ रोजी निर्देशांक व अनुशेष समितीने सिंचनक्षेत्र वगळता अन्य सर्व क्षेत्रांमधील परिगणना केलेला एकंदरीत अनुशेष हा, रु. ६५८८.७७ कोटी (जोडपत्र-१) इतका होता. वित्तीय वर्ष १९९५-९६ पासून ३१ मार्च २०१५ पर्यंतचा अनुशेष दूर करण्यावरील झालेला खर्च वजा

केल्यानंतर सिंचनाव्यतिरिक्त अन्य क्षेत्रांतील अनुशेष रु. ३७८.७९ कोटी गणना करण्यात आला आहे (जोडपत्र-९). वित्तीय अनुशेष फक्त सार्वजनिक आरोग्य क्षेत्रामध्ये अस्तित्वात आहे.

ऊर्जाक्षेत्रः कृषी पंपसंचाना वीज पुरवठा करणे

२२. ऊर्जा विभागाने कळविल्यानुसार ३१ मार्च २०१५ रोजीच्या कृषी पंप विद्युतीकरणाचा शिल्लक अनुशेष २६८०३ होता. विभागाने ठाणे, रायगड, रत्नागिरी, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्हयांमध्ये २०१५-१६ मध्ये १२५०० कृषी पंप विद्युतीकरणाचे उद्दिष्ट ठेवले होते.२०१५-१६ मध्ये ३१ डिसेबंर २०१५ पर्यंत भौतिक साध्य फक्त ७३०८ पंप एवढे आहे. रायगड जिल्हयाचा भौतिक अनुशेष दूर झाला आहे.

२३. विभागाने ठाणे, रत्नागिरी, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्यांमध्ये २०१६-१७ मध्ये १४७०० कृषी पंप विदयूतीकरणाचे उद्दिष्ट प्रस्तावित केले आहे. त्यासाठी रु. २५८.७२ कोटींची मागणी प्रस्तावित केली आहे. त्या नुसार आर्थिक वर्ष २०१६-१७ साठीचे नियतवाटप जोडपत्र-१० मध्ये दर्शविले आहे.

२४. दि. १० मार्च २०१५ च्या निदेशामधील परिच्छेद २२ नुसार, केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांतर्गत ७५४० सौर कृषीपंप उभारणी योजनेबाबत निदेश दिले होते. राज्यपाल यांनी असे लक्षात घेतले होते की, असे सौरपंप जिथे परंपरागत विद्युतजोडणी करणे अवघड जाते अशा दुर्गम आदिवासी भागात उभारणे योग्य राहील. राज्यपाल यांनी असे निदेशीत केले होते की, दुर्गम वस्त्या जेथे नेहमीचा विद्युतीकरणाचा कार्यक्रम घेणे शक्य नाही तेथे प्राधान्याने सौरपंप उभारणीचा कार्यक्रम घ्यावा. आणखी, जेथे आवश्यक व शक्य असेल तेथे सौरऊर्जेद्वारे घरे, अंगणवाडी, शाळा, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, पिण्याच्या पाण्याची योजना आणि रस्त्यांवरील दिवे यांच्या विद्युतीकरणाची योजनाही हाती घ्यावी, ज्यायोगे ग्रामस्थांच्या सर्व गरजा एकत्रीतरित्या पूर्ण होतील. ऊर्जा विभागाने या निदेशांच्या अंमलबजावणीबाबतच्या प्रगतीपर अहवाल सादर करावा.

## उच्च व तंत्र शिक्षण

२५. तंत्रनिकेतनाच्या उपक्षेत्रामध्ये भौतिक अनुशेष पूर्णतः दूर झाला असून अनुशेष योजने अंतर्गत निधी संस्थात्मक अनुशेष निर्मूलनासाठी देण्यात येत आहे. २२ तंत्रनिकेतनाची बांधकामे या योजनेअंतर्गत घेण्यात आली होती, त्यापैकी १५ बांधकामे पूर्ण झाली आहेत. विभागाने आता असे कळविले आहे की, ८ बांधकामे प्रगतीपथावर असून २ कामांना सुधारित अंदाजांच्या मान्यतेसाठी राखून ठेवण्यात आले आहे. दिनांक २१ जानेवारी २०१६ च्या पत्रानुसार विभागाने यासाठी आर्थीक वर्ष २०१६-१७ मध्ये रु. ३२.७६ कोटींची मागणी प्रस्तावित केले आहेत.

## कौशल्य विकास आणि उदयोजकता

२६. तंत्र माध्यमिक शाळा उपक्षेत्रामध्ये, मुंबई शहर (३०९ जागा) आणि मुंबई उपनगर जिल्हा (२४० जागा) असा एकूण ५४९ विदयार्थी जागांचा अनुशेष शिल्लक आहे. विभागाने मुंबई आणि उपनगर जिल्हयांमधील तंत्र माध्यमिक शाळांमध्ये १५ नवीन पदे निर्माण करण्याबाबत वित्त विभागाकडे प्रस्तावित केले. राज्यपाल यांनी अनुशेष लवकरात लवकर दूर करण्यात यावा असे निदेश दिले आहेत. दिनांक २० जानेवारी २०१६ च्या पत्रानुसार विभागाने मालेगाव (नाशिक) , कामठी (नागपूर) आणि खेड (रत्नागिरी) येथील तंत्र माध्यमिक शाळा बांधकामासाठी आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये रु. २ कोटींची मागणी प्रस्तावित केली आहे.

२७. औद्योगिक प्रशिक्षण संस्था उपक्षेत्रामध्ये विभागाने वर्ष २०१६-१७ मध्ये लोअर परेल (जिल्हा मुंबई), सेलू (जिल्हा परभणी) आणि कामठी (जिल्हा नागपूर) येथील चालू बांधकामे पूर्ण करण्यासाठी रु. ७ कोटींची मागणी प्रस्तावित केली आहे. राज्यपाल यांचे निदेशानुसार आर्थिक वर्ष २०१६-१७ साठीचे प्रदेशनिहाय व उपक्षेत्रनिहाय नियतवाटप जोडपत्र-१० मध्ये दर्शविण्यात आले आहे.

## सार्वजनिक आरोग्य सेवा

२८. दिनांक १ एप्रिल, २००० रोजी सार्वजनिक आरोग्य क्षेत्रामध्ये रु. १३५३.६७ कोटी वित्तीय अनुशेष होता. ३१ मार्च २०१५ पर्यंतचा खर्च विचारात घेता, या क्षेत्रामध्ये रु. ३७८.७९ कोटी चा वित्तीय अनुशेष अदयाप शिल्लक आहे. राज्यपाल यांनी चिंता व्यक्त केली आहे की, गेल्या ५-६ वर्षामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाला अनुशेष निर्मूलनासाठी नियत वाटप केलेल्या निधीपैकी पुरेसा निधी खर्च करणेही शक्य झाले नाही. आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये सुद्‍धा सार्वजनिक आरोग्य क्षेत्राचा, एकूण रु. १६७.८० कोटी तरतुदी पैकी, डिसेंबर २०१५ अखेरचा खर्च रु. ३४.३२ कोटी एवढाच आहे. राज्यपाल यांना सार्वजनिक आरोग्य हे वित्तीय अनुशेष शिल्लक असलेले एकमेव क्षेत्र असल्यामुळे चिंता वाटते. म्हणून, राज्यपाल यांनी असे निदेशित केले आहे की, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य यांनी अनुशेष निर्मूलन कार्यक्रमातंर्गत २०१६-१७ साठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या तरतुदी निश्चितपणे खर्च होतील याबाबत सविस्तर कार्यक्रम तयार करावा. हा कार्यक्रम हे निदेश निर्गमित झाल्यापासून दोन महिन्यांत राज्यपाल यांचे अवलोकनार्थ सादर करावा.

२९. राज्यपाल यांनी, विभागाने केलेल्या विनंतीनुसार वित्तीय वर्ष २०१६-१७ करिता ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे, रुग्णवाहिका, उपकरणे व इतर साधनसामग्री आणि फर्निचर या करीता, रु. १०१.४५ कोटी ठेवण्याबाबत निदेश दिले आहेत. हे नियतवाटप जोडपत्र-१० मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे.

## सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रातील अनुशेष दूर करण्यासाठी नियतवाटप

३०. राज्यपालांनी असे निदेश दिले आहेत की, वार्षिक योजना २०१६-१७ मध्ये सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रांमधील अनुशेष दूर करण्यासाठी रु.४०१.९३ कोटी इतक्या रकमेचे नियतवाटप राखून ठेवण्यात यावे. सन २०१६-१७ या वर्षात अनुशेष दूर करण्यासाठी या नियतव्ययाचे प्रदेशनिहाय नियतवाटप खालील तक्ता २ प्रमाणे करण्यात यावे.

तक्ता २. २०१६-१७ साठी सिंचन क्षेत्राव्यतिरीक्त अन्य क्षेत्रांचे विभाज्य नियतव्ययाचे प्रदेश निहाय अंतीम नियतवाटप

| अ. क्र. | प्रदेश | अनुशेष निर्मूलनासाठी नियतव्यय (रु. कोटीत) (जोडपत्र १०) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | विदर्भ | ११०.७३ | २७.५५% |
| २ | मराठवाडा | २१.५३ | ५.३६% |
| ३ | उर्वरित महाराष्ट्र | २६९.६७ | ६७.०९% |
| ४ | एकूण | ४०१.९३ | १००.००% |

३१. प्रदेशांतर्गत अनुशेष दूर करण्यासाठीचे क्षेत्र-निहाय नियतवाटप जोडपत्र १० मध्ये दर्शविलेले आहे. राज्यपाल यांनी निदेशित केले आहे की, सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रातील अनुशेष निर्मूलनासाठीचे नियतवाटप काटेकोरपणे निदेशानुसार आणि त्या विभागाच्या नियमित योजनांतर्गत नियतव्ययापेक्षा जास्तीचे असावे.

३२. सार्वजनिक आरोग्य आणि उच्च व तंत्र शिक्षण क्षेत्रांच्या नियतव्ययाचा मोठा भाग चालू स्थापत्य कामांसाठी आहे. राज्यपाल यांनी सार्वजनिक आरोग्य, उच्च आणि तंत्र शिक्षण, नियोजन, वित्त आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यामध्ये समन्वय असण्याच्या आवश्यकतेवर भर दिला आहे, जेणेकरुन अनुशेष निर्मूलनासाठीच्या निधीचा वापर होईल आणि अभियान पद्धतीने कामे पूर्ण होतील.

उर्वरित योजनांतर्गत नियतव्ययाचे वाटपाची तत्वे

३३. सिंचन क्षेत्रासाठी असलेले नियत वाटप आणि अनुशेष असलेल्या इतर क्षेत्रांमधील अनुशेष दूर करण्यासाठी असलेला निधी वजा केल्यानंतर, योजनांतर्गत उर्वरित नियतव्ययाचा विभाज्य भाग, तीन प्रदेशांमध्ये त्या त्या

प्रदेशाच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात संवितरित करण्यात यावा. असे करतांना जनगणना २०११ ची आकडेवारी विचारात घ्यावी. योजनांतर्गत उर्वरित नियतव्ययाच्या प्रदेशनिहाय नियत वाटपात, त्या क्षेत्रामधील त्या त्या प्रदेशांच्या गरजा व विकासाच्या संधी यांचा विचार करुन, त्या तीन प्रदेशांमध्ये क्षेत्रनिहाय वितरण करण्याची लवचिकता असेल. तथापि प्रदेशाची सर्व क्षेत्रीय नियतव्ययाची एकूण रक्कम ही योजनांतर्गत उर्वरित नियतव्ययातील त्या प्रदेशाच्या हिश्श्याच्या एकूण कमाल मर्यादेच्या अधिन राहील.

योजनेतर विकास नियतव्ययाचे वाटपाची तत्वे

३४. आदेशाच्या नियम ७ नुसार, एकूण राज्याच्या म्हणून असलेल्या गरजांचा विचार करुन, विकास मंडळांच्या क्षेत्रांवरील विकास खर्चासाठी निधींचे समन्याय्यतेने नियतवाटप होत असल्याची खात्री करुन घेणे, ही महाराष्ट्राचे राज्यपाल यांची विशेष जबाबदारी आहे. विकास खर्चाच्या नियतव्ययाचे वाटप दोन भागात, योजनांतर्गत आणि योजनेतर, होत असल्यामुळे राज्यपाल यांना समन्यायी नियतव्यय वाटपाची तत्वे योजनेतर विकास नियतव्ययासाठी लागू करणे आवश्यक वाटले. म्हणून राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की योजनेतर विकास नियतव्ययाचे वाटप तीन प्रदेशांमध्ये त्या त्या प्रदेशाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात करण्यात यावे. योजनेतर विकास नियतव्ययाच्या प्रदेशनिहाय नियतवाटपात त्या क्षेत्रामधील त्या त्या प्रदेशांच्या गरजा व विकासाच्या संधी यांचा विचार करुन, त्या तीन प्रदेशांमध्ये क्षेत्रनिहाय वितरण करण्याची लवचिकता असेल. तथापि प्रदेशाची सर्व क्षेत्रीय नियतव्ययाची एकूण रक्कम ही योजनेतर विकास नियतव्ययातील त्या प्रदेशाच्या हिश्श्याच्या एकूण कमाल मर्यादेच्या अधिन राहील. राज्यपालांच्या पूर्वमान्यतेशिवाय, कोणताही निधी अनुशेष असलेल्या जिल्हयांकडून अनुशेष नसलेल्या जिल्हयांकडे आणि एका विकास मंडळांच्या क्षेत्राकडून दुस-या विकास मंडळाच्या क्षेत्राकडे वळविता येणार नाही.

विकास मंडळे

३५. प्रत्येक विकास मंडळांनी कमीत कमी दोन जिल्हयांचा जिल्हा विकास अहवाल तयार करावा हे निदेश दिनांक १७ मार्च, २०१२ च्या निदेशाप्रमाणे चालू राहतील. जिल्हयांची निवड करतांना विकास मंडळांनी मानव विकास निर्देशांक

कमी असलेल्या जिल्हयांना प्राधान्य दयावे. आणखी, विकास मंडळांच्या उद्‌देशानुसार मंडळांनी इतर अभ्यासही घेऊ शकतात. वरील जबाबदा-या पार पाडण्यासाठी राज्यपालांनी प्रत्येक विकास मंडळासाठी रु.२ कोटी राखून ठेवावेत असे निदेश दिले आहेत. नियोजन विभागाने मंडळांच्या आवश्यकतेनुसार त्यांना निधी उपलब्ध करुन दयावा.

प्रदेशनिहाय विकासाचा समतोल यावरील तज्ज्ञ समिती

३६. महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशीक विकासाच्या प्रश्नावरील उच्चस्तरीय समितीने आपला अहवाल ऑक्टोबर २०१३ मध्ये राज्यपाल यांना सादर केला आहे. राज्यपाल यांनी या अहवालाबाबत राज्य शासनाचे मत मागविले आहे. उच्च स्तरीय समितीच्या शिफारशी स्वीकारण्या संदर्भात जानेवारी २०१५ मध्ये मंत्रिमंडळ उप समिती गठित करण्यात आली आहे. राज्यपाल यांची अशी अपेक्षा आहे की, राज्यशासन हा अहवाल, समितीच्या शिफारशी, नियतवाटपांची तत्वे यांसह विचारार्थ घेईल आणि यावरील आपली मते तातडीने राज्यपाल यांच्या विचारार्थ सादर करेल.

अनुच्छेद ३७१ (२) (ग) नुसार राज्यपालांची विशेष जबाबदारी

३७. संविधानाच्या अनुच्छेद ३७१(२) (ग) आणि विकास मंडळे आदेश २०११ च्या खंड १० नुसार, राज्यपाल यांना प्रत्येक विकास मंडळ क्षेत्राअंतर्गत तंत्रशिक्षण व व्यवसाय प्रशिक्षण यांसाठी पर्याप्त सुविधा आणि राज्यशासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये नोकरीच्या पर्याप्त संधी उपलब्ध करणारी समन्याय व्यवस्था करण्याबाबतची विशेष जबाबदारी आहे.

३८. दिनांक १५ फेब्रुवारी २०१४ च्या निदेशातील परिच्छेद ३१ नुसार, राज्यपालांनी विकास मंडळ क्षेत्र निहाय तंत्रशिक्षण व व्यवसाय प्रशिक्षण यासाठीच्या पुरेशा सुविधा आणि राज्यशासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये नोकरीच्या संधी याबाबतच्या सदयस्थितीचा आढावा घेण्याची इच्छा व्यक्त केली होती. राज्यपाल यांनी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने गेल्या तीन शैक्षणिक वर्षासाठीची तंत्र शिक्षण व व्यवसाय प्रशिक्षण देणा-या राज्य आणि केंद्र शासन तसेच अनुदानित व विनाअनुदानित खाजगी संस्थाकडील विदयार्थी प्रवेश क्षमता आणि विदयार्थी प्रवेशांचे क्षेत्र-निहाय प्रतिनिधीत्व याबाबतची माहिती सादर करण्याचे निदेश दिले होते. शासनाने नुकतीच शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील

व्यावसायिक तंत्र पदवीपूर्व पाठयक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विदयार्थ्यांची माहिती सादर केली आहे. राज्यपाल यांचे असे निदेश आहेत की, शासनाने अशा पाठयक्रमांसाठी प्रवेश घेणा-या विदयार्थ्यांच्या प्रदेशनिहाय प्रमाणात तफावती संदर्भात मार्ग सूचविण्यासाठी समिती गठित करावी. ही समिती विविध प्रदेशात स्थापन झालेल्या उच्च व तंत्र शिक्षण संस्थांच्या संख्येमध्ये प्रादेशिक असंतुलनाचा अभ्यास करील आणि प्रादेशिक असंतुलन सुधारण्याबाबत उपाय सुचवेल. सदर उपायांबाबतचा अहवाल हे निदेश निर्गमित झाल्यापासून ६ महिन्यात सादर करावा.

३९. राज्यपाल यांनी सामान्य प्रशासन विभागाने राज्यशासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये क्षेत्रनिहाय प्रतिनिधित्वाबाबतची आकडेवारी सादर करण्याबाबतही निदेशीत केले होते. स्थानिक स्वराज्य संस्था, स्वायत्त संस्था आणि सरकार पुरस्कृत महामंडळे या बाबतची महितीही यासाठी विचारात घ्यावयाची होती. राज्यपाल यांनी लक्षात घेतले आहे की, वित्त मंत्री यांचे अध्यक्षतेखाली याबाबत मंत्रिमंडळ उपसमिती गठित करण्यात आली आहे. राज्यपाल यांचे असे निदेश आहेत की, उप समितीचा अहवाल लवकरात लवकर सादर करण्यात यावा.

निदेशांचे अनुपालन

४०. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम २१ (१) व (२) मधील तरतुदींनुसार, राज्यपालांच्या निदेशानुसार अनुशेष निर्मूलनाची विशेष जबाबदारी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्रधिकरणावर आहे. राज्यपाल यांनी अमरावती विभागातील चार जिल्हयातील सिंचन अनुशेष निर्मूलनाबाबत राज्यपालांच्या निदेशांच्या अंमलबजावणीवर संनियंत्रणाची जबाबदारी, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडे सोपविण्यात आलेली आहे. त्यानुसार, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने अनुशेष असलेल्या जिल्हयातील सिंचन क्षेत्राशी संबंधीत निदेशांच्या अंमलबजावणीबाबत विशेष करुन सुधारित प्रशासकिय मान्यता, पुर्नविनियोजनाचे अधिकार, पुरेशा कर्मचारी वर्गाची उपलब्धता, भूसंपादन आणि पुनर्वसन या बाबींचा नियतकालीक आढावा घ्यावा. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने निदेशांच्या अंमलबजावणीबाबत पूर्तता अहवाल, काही शिफारसी असल्यास त्यांसह, राज्यपालांना तिमाही सादर करावा.

४१. राज्यपाल यांनी त्यांच्या दि. १० मार्च २०११ च्या निदेशामध्ये सिंचनक्षेत्रासह सर्व क्षेत्रांचे प्रदेशनिहाय नियतव्यय आणि खर्चाबाबत तपशीलवार माहिती संकलित करण्याची कार्यप्रणाली विकसीत करण्याबाबत आदेशीत केले होते. राज्यपाल यांनी निदेशीत केले होते की, नियोजन विभागाने आर्थिक वर्ष २०१०-११ पासूनची प्रदेश निहाय योजनाअंतर्गत खर्चाची आकडेवारी प्रसिद्ध करावी आणि प्रदेशांतर्गत आधिक्य किंवा निधी वळविणे यांचे प्रमाण दर्शवावे. या निदेशांच्या अनुपालनाअंतर्गत, नियोजन विभागाने आर्थिक वर्ष २०१४-१५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात वर्ष २०१२-१३ ची, तर आर्थिक वर्ष २०१५-१६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात वर्ष २०१३-१४ ची माहिती सादर केली आहे. तथापि, आर्थिक वर्ष २०१०-११, २०११-१२ आणि २०१४-१५ ची संकलित माहिती अदयाप सादर झालेली नाही. राज्यपाल यांनी प्रदेश निहाय योजनंतर्गत खर्चाची वर दर्शविल्याप्रमाणे संकलित माहिती लवकरात लवकर प्रसिध्द करावी असे निदेश दिले आहेत.

४२. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१ च्या खंड (२) चे उपखंड (ख) आणि आदेशातील नियम ७ नुसार योजनेतर विकास खर्चाचे प्रदेश निहाय समन्यायी वाटप देखील राज्यपाल यांच्या कार्यकक्षेत येत असल्यामुळे, राज्यपाल यांनी वित्त विभागाला योजनेतर खर्चाची आकडेवारीसुध्दा प्रसिध्द करण्याविषयी दि. १७ मार्च २०१२ च्या निदेशामध्ये निदेश दिले होते. हे निदेश १३ मार्च २०१३, १५ फेब्रुवारी २०१४ आणि १० मार्च २०१५ च्या निदेशांमध्ये पुनश्च देण्यात आले होते. वित विभागाने आर्थीक वर्षे २०११-१२ आणि २०१२-१३ साठीची प्रदेश निहाय खर्च (योजनेतर) ची माहिती सादर केली आहे. तथापि, आर्थिक वर्ष २०१३-१४ व त्यापुढील वर्षाची प्रदेश निहाय योजनेतर विकास खर्चाची माहिती सादर झालेली नाही. गत वर्षीचे प्रदेश निहाय योजनांतर्गत आणि योजनेतर खर्चाचे संकलन जुलै २०१६ पर्यंत करण्यात यावे असे निदेश आहेत.

४३. राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, प्रदेशनिहाय योजनाअंतर्गत खर्च आणि योजनेतर विकास खर्चाची आकडेवारी दरवर्षी लवकरात लवकर प्रकाशित करावी. राज्यपाल यांनी असेही निदेशीत केले आहे की, अर्थसंकल्पातील पारदर्शकतेची खात्री होण्यासाठी ही आकडेवारी "ऑन लाईन" ठेवण्यात यावी.

४४. दिनांक १३ मार्च २०१३ च्या निदेशातील परिच्छेद ३७ नुसार, नियोजन विभागाने अर्थसंकल्प पत्रकांतील अविभाज्य खर्चाची बाब निहाय पुनर्तपासणी करावी आणि शक्य असेल तिथे त्या त्या प्रदेशांसाठी खर्च दर्शवावा असे

राज्यपाल यांनी निदेशीत केले होते. दि. १० मार्च २०१५ च्या परिच्छेद ३९ मध्ये राज्यपाल यांनी पुनःश्च असे निदेशीत केले आहे की, बाब निहाय खर्चाचे वर्गीकरण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत ज्यायोगे कोणतीही विभाज्य बाब चुकीने अविभाज्य बाब म्हणून गणली जाणार नाही याची खात्री होईल. असे निदेश असतांनाही, राज्यपाल यांनी चिंता व्यक्त केली आहे की वार्षीक योजना २०१५-१६ मध्ये, जलसंपदा क्षेत्र वगळता अविभाज्य नियतव्ययाचे प्रमाण एकूण योजना नियतव्ययाच्या ३९.५८% आहे. अविभाज्य नियतव्ययाचे असे मोठे प्रमाण दर्शविते की, अविभाज्य बाबी, ज्यांचे विभाज्य म्हणून वर्गीकरण होऊ शकले असते त्यांचे, त्या त्या प्रदेशामध्ये वर्गीकरण योग्य पद्धतीने झालेले नाही. सदर वर्गीकरण योग्य पध्दतीने करुन या बाबतचा तपशील जुलै २०१६ पर्यंत राज्यपालांना सादर करावा.

४५. राज्यपालांच्या दिनांक १३ मार्च २०१३ च्या निदेशातील परिच्छेद ३८ नुसार निदेशांच्या अंमलबजावणीबाबत विभागीय आयुक्तांनी अनुशेष असलेल्या क्षेत्रांच्या अनुशेष निर्मूलनाबाबत त्रैमासिक आढावा घेण्याबाबत राज्यपाल यांनी निदेश दिले होते. विभागीय आयुक्तांनी अनुशेष निर्मूलन कार्यक्रमाच्या कामांच्या प्रगतीचा त्रैमासीक आढावा घेण्याबाबतचे निदेश चालू राहतील.

४६. राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, मुख्य सचिवांनी चालू तसेच पूर्वीच्या निदेशातील अनुपालनांचा आढावा घ्यावा आणि धोरणात्मक मुद्दे असल्यास त्यांचे शासनस्तरावर योग्य निराकरण करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(बी.वेणुगोपाल रेड्डी)
राज्यपालांचे सचिव

राजभवन, मुंबई.
दिनांक : ११ मार्च, २०१६.

जोडपत्र - १

निर्देशांक व अनुशेष समितीने गणना केल्यानुसार (दिनांक १ एप्रिल,१९९४ रोजी असल्याप्रमाणे) प्रदेशनिहाय वित्तीय अनुशेष दर्शविणारे विवरणपत्र.

(रुपये कोटीत)

| अनुक्रमांक | प्रदेश | सिंचन | इतर अनुशेष क्षेत्र | एकूण अनुशेष |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | विदर्भ | ४०८३.०० (५५.०४%) | २५४१.०२ (३८.५७%) | ६६२४.०२ (४७.६०%) |
| २ | मराठवाडा | २४०१.०० (३२.३७%) | १६०३.५५ (२४.३४%) | ४००४.५५ (२८.७७%) |
| ३ | उर्वरित महाराष्ट्र | ९३४.०० (१२.५९%) | २४४४.२० (३७.०९%) | ३३७८.२० (२३.६३%) |
| ४ | एकूण | ७४१८.०० (१००%) | ६५८८.७७ (१००%) | १४००६.७७ (१००%) |

आधार : निर्देशांक व अनुशेष समिती अहवाल

जोडपत्र - २

अमरावती विभागातील गत ८ वर्षातील दूर झालेला भौतिक अनुशेष

जून २००७ चा अनुशेष - ३,३८,०७० हेक्टर

| | उर्वरित अनुशेष (हेक्टर रसतु मध्ये) | मागील वर्षात दूर झालेला अनुशेष ( हेक्टर रसतु मध्ये) |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| जून २००८ | २,९१,३७० | ४६,७०० |
| जून २००९ | २,६३,४५३ | २७,९१७ |
| जून २०१० | २,५७,५१८ | ५,९३५ |
| जून २०११ | २,४७,९४८ | ९,५७० |
| जून २०१२ | २.३४,०१९ | १३,९२९ |
| जून २०१३ | २,२७,२६९ | ६,७५० |
| जून २०१४ | २,२३,७०५ | ३,५६४ |
| जून २०१५ | २,१४,२६९ | ९४३६ |

आधार : विदर्भ सिंचन विकास मंडळ, जलसंपदा विभाग आणि महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांचे अहवाल.

## जोडपत्र - ३

## सुधारित भौतिक अनुशेष निर्मूलन कार्यक्रम *

(हेक्टर रसतु)

| अनु क्रमांक | जिल्हा | १ जुलै २०१५ रोजीचा शिल्लक भौतिक अनुशेष | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | अमरावती | ७७१०५ | ८३०८ | २६७०२ | २९०२६ | १९८५० | ८३८८६ |
| २ | अकोला | ४७५१६ | २१८९ | २७४० | ३८५६९ | ७६६३ | ५११६१ |
| ३ | वाशीम | २८४३१ | ९४९१ | १८४५४ | ३७१४ | ७७३ | ३२४३२ |
| ४ | बुलढाणा | ६१२१७ | ७४०० | १०२६६ | ५०४८ | ४१०५६ | ६३७७० |
| एकूण विभाग | | २१४२६९ | २७३८८ | ५८१६२ | ७६३५७ | ६९३४२ | २३१२४९ |

* जलसंपदा विभागाने दिनांक २६ ऑक्टोबर २०१५ रोजीच्या महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची आढावा बैठक आणि राज्यपाल यांनी बोलविलेल्या दि. ३ नोव्हेंबर २०१५ रोजीच्या सभेमध्ये सादर केल्यानुसार

## जोडपत्र – ४

## चालू सिंचन प्रकल्पांची शिल्लक किंमत

| अनुक्रमांक | प्रदेश | दि.१.४.२०१५ रोजीची प्रकल्प संख्या | १ एप्रिल २०१५ रोजीची शिल्लक किंमत(रु. कोटीत)@ |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | विदर्भ | १७२ | २६१३८.२१ |
| २ | मराठवाडा | ७२ | १३५१३.०८ |
| ३ | उर्वरित महाराष्ट्र | १५९ | ३४३५६.७१ |
| | एकूण | ४०३ | ७४००८.०० |

@ तात्पुरती किंमत

आधार : जलसंपदा विभाग

## जोडपत्र – ५ अ

## वार्षिक योजना २०१६-१७ मधील सिंचन क्षेत्रातील नियतव्ययाच्या नियत वाटपाची तत्वे दर्शविणारे विवरणपत्र

| प्रदेश | लोकसंख्या * | लोकसंख्येची टक्केवारी | निव्वळ पेरलेले क्षेत्र (००० हेक्टर)# | निव्वळ पेरलेल्या क्षेत्राची टक्केवारी | लोकसंख्या आणि निव्वळ पेरलेले क्षेत्र यांचा भार (समान) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| विदर्भ | २,३०,०३,१७९ | २३.०३% | ५१०६.८ | २८.२७% | २५.६५% |
| मराठवाडा | १,८७,२७,७४८ | १८.७५% | ४७५५.९ | २६.३३% | २२.५४% |
| उर्वरित महाराष्ट्र | ५,८१,६३,५९८ | ५८.२३% | ८१९९.३ | ४५.४०% | ५१.८१% |
| एकूण | ९,९८,९४,५२५ | १००.००% | १८०६२ | १००.००% | १००.००% |

* आधार : जनगणना २०११

# आधार : निर्देशांक व अनुशेष समिती अहवाल खंड एक

जोडपत्र - ५ ब

आदिवासी उप योजनेमधील सिंचन क्षेत्रातील नियत व्ययाच्या नियत वाटपाची तत्वे दर्शविणारे विवरणपत्र-

(रुपये कोटीत)

| प्रदेश | आदिवासी लोकसंख्या | लोकसंख्येची टक्केवारी | जनजाति उपयोजनेखालील क्षेत्र ( चौ.कि. मी.) | जनजाति उपयोजनेखालील क्षेत्राची टक्केवारी | लोकसंख्या आणि क्षेत्र यांचा भार (समान) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| विदर्भ | २९,१८,७३७ | २८.१२% | ३११०१ | ५६.०७% | ४२.०९% |
| मराठवाडा | ७,४६,०४१ | ७.१९% | १९८३ | ३.५८% | ५.३८% |
| उर्वरित महाराष्ट्र | ६७,१५,७८२ | ६४.६९% | २२३८२ | ४०.३५% | ५२.५२% |
| एकूण | १,०३,८०,५६० | १००.००% | ५५४६६ | १००.००% | १००.००% |

आधार : जनगणना २०११ व आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन

जोडपत्र - ६

आर्थिक वर्ष २००८-०९ ते२०१२-१३ मध्ये आधिक्य/तुटीबाबत दुरुस्तीचा संकलित स्वरुपातील विवरणपत्र

(रु. कोटीत)

| | आर्थिक वर्षासाठी करावयाच्या दुरुस्त्या | | | | | | आर्थिक वर्षामध्ये करावयाच्या दुरुस्त्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रदेश | २००८.०९ | २००९.१० | २०१०.११ | २०११.१२ | २०१२.१३ | एकूण | २०१४.१५ = स्तंभ ७/३ | २०१५.१६ = स्तंभ ७/३ | २०१६.१७ = स्तंभ ७/३ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| विदर्भ | -४१६.१० | -७४४.९८ | -४३३.०८ | -२६२.७१ | ४५४.६५ | -१४०२.२२ | -४६७.४१ | -४६७.४१ | -४६७.४१ |
| मराठवाडा | -१२७.१५ | -१२.७० | ८५.९२ | २१७.२५ | ६८.११ | २३१.४४ | ७७.१५ | ७७.१५ | ७७.१५ |
| उर्वरित महाराष्ट्र | ५४३.२५ | ७५७.६८ | ३४७.१६ | ४५.४६ | ५२२.७६ | ११७०.७९ | ३९०.२६ | ३९०.२६ | ३९०.२६ |

स्त्रोतः आर्थिक वर्ष २०१४-१५ चे निदेश दिनांक १५.२.२०१४ मधील जोड पत्र ७ फ पुन्हा देण्यात येत आहे.

( स्तंभ २ ते ७ मधील उणे चिन्ह खर्चामधील तुट दर्शविते तर स्तंभ ८ ते १० मधील उणे चिन्ह अतिरिक्त नियतव्ययाबाबतची दुरुस्ती दर्शविते).

जोडपत्र -७

उपलब्ध नियत वाटपातून अनुशेष दूर करणे, तीन प्रदेशांसाठी निधीचे नियत वाटप आणि त्यानंतर उर्वरित निधीचे लोकसंख्या व निव्वळ पेरणी क्षेत्र यांच्या भारांकाच्या आधारे करावयाचे संवितरण दर्शविणारे विवरणपत्र वार्षिक योजना २०१६-१७

(रुपये कोटीत)

| | |
|---|---|
| सिंचन क्षेत्रासाठी विभाज्य नियतव्यय | ५३६०.५३ |
| अनुशेष दूर करण्यासाठी दिलेला नियतव्यय | ७५० |
| नियत वाटप तत्वानुसार नियत वाटपासाठी उपलब्ध नियतव्यय | ४६१०.५३ |

| प्रदेश | अनुशेष जिल्हयांसाठी विशेष नियत वाटप | लोकसंख्या व निव्वळ पेरलेले क्षेत्र यांचे प्रदेशनिहाय प्रमाण(सम प्रमाणात) (जोडपत्र ५ अ स्तंभ ६ पहा) | शिल्लक निधींचे संवितरण स्तंभ ३ मधील प्रमाणानुसार | २००९-२०१३ मध्ये खर्चातील आधिक्य/तुटी आणि ( २०१४-१५ ते २०१६-१७ वर्षांसाठीची) सुधारित सुरुवातीची शिल्लक (निदेश २०१४-१५ दिनांक १५ फेब्रुवारी २०१४ जोडपत्र ७ फ स्तंभ ८ पहावा) (जोडपत्र ६ पहा) . | एकूण नियतवाटप |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६=स्तंभ २ + स्तंभ ४ + स्तंभ ५ |
| विदर्भ | ७५० | २५.६५% | ११८२.६० | ४६७.४१ | २४००.०१ |
| मराठवाडा | ० | २२.५४% | १०३९.२२ | -७७.१५ | ९६२.०७ |
| उर्वरित महाराष्ट्र | ० | ५१.८१% | २३८८.७१ | -३९०.२६ | १९९८.४५ |
| एकूण | ७५० | १००.००% | ४६१०.५३ | | ५३६०.५३ |

जोडपत्र - ८

आदिवासी लोकसंख्या व आदिवासी उपयोजना क्षेत्र यांच्या भारांकाच्या आधारे आदिवासी उप योजना अंतर्गत जलसंपदा निधीचे संवितरण दर्शविणारे विवरणपत्र वार्षिक योजना २०१६-१७

(रुपये कोटीत)

| | |
|---|---|
| सिंचन क्षेत्रासाठीचा विभाज्य नियतव्यय | ५० |

| प्रदेश | आदिवासी लोकसंख्या आणि आदिवासी उप योजना क्षेत्र यांचे प्रदेशनिहाय भारांक (समान भार) | नियतवाटप |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| विदर्भ | ४२.०९% | २१.०४ |
| मराठवाडा | ५.३८% | २.६९ |
| उर्वरित महाराष्ट्र | ५२.५२% | २६.२७ |
| एकूण | १००.००% | ५०.०० |

## जोडपत्र - ९

### १ मार्च २०१५ रोजी असल्याप्रमाणे सार्वजनिक आरोग्य विकास क्षेत्रातील प्रदेशनिहाय उर्वरित वित्तीय अनुशेष दर्शविणारे विवरणपत्र

(रुपये कोटीत)

| विदर्भ | | मराठवाडा | | उर्वरित महाराष्ट्र | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.४.२००० रोजी असलेला अनुशेष | १.३.२०१५ रोजी असलेला उर्वरित अनुशेष | १.४.२००० रोजी असलेला अनुशेष | १.३.२०१५ रोजी असलेला उर्वरित अनुशेष | १.४.२००० रोजी असलेला अनुशेष | १.३.२०१५ रोजी असलेला उर्वरित अनुशेष | १.४.२००० रोजी असलेला अनुशेष | १.३.२०१५ रोजी असलेला उर्वरित अनुशेष |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १८७.३४ | ० | ४२२.७४ | २१५.७७ | ७४३.५९ | १६३.०२ | १३५३.६७ | ३७८.७९ |
| | ० % | | ५६.९६% | | ४३.०४ % | | १००% |

जोडपत्र -१०

वार्षिक योजना २०१६-१७ मध्ये सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रतील अनुशेष दूर करण्यासाठी नियतव्ययाचे क्षेत्र-निहाय नियत वाटप दर्शविणारे विवरणपत्र

(रुपये कोटीत)

| अ.क्र. | क्षेत्र | विदर्भ | मराठवाडा | उर्वरित महाराष्ट्र | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | तंत्र शिक्षण | | | | |
| अ | तंत्रनिकेतन | ४.३३ | ३.७९ | २४.६४ | ३२.७६ |
| २ | कौशल्य विकास आणि उदयोजकता | | | | |
| अ | औदयगिक प्रशिक्षण संस्था | २.०० | २.०० | ३.०० | ७.०० |
| ब | तंत्र माध्यमिक शाळा | ०.५० | ० | १.५० | २.०० |
| ३ | सार्वजनिक आरोग्य | १४.१४ | १५.७४ | ७१.५७ | १०१.४५ |
| ४ | पंपसंचांचे विदयुतीकरण | ८९.७६ | ०० | १६८.९६ | २५८.७२ |
| | एकूण (१ +२ +३) | ११०.७३ | २१.५३ | २६९.६७ | ४०१.९३ |
| | | २७.५५% | ५.३६% | ६७.०९% | १००% |

तळटीप :- परिच्छेद ३५ मध्ये स्पष्ट केलेल्या प्रयोजनाकरिता वरील नियतवाटपाखेरीज, रुपये २ कोटी इतकी रक्कम प्रत्येक विकास मंडळाकरीता राखून ठेवण्यात येईल.